# अखेरचा सवाल

वसंत कानेटकर

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अखेरचा सवाल**
वसंत कानेटकर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
वसंत कानेटकर
अंजली प्रियदर्शन कानेटकर
रा. प्लॉट नं. १४, 'प्रियांजली',
पामस्प्रिंग, सावरकर नगर,
गंगापूर रोड, नाशिक- ४२२०१३.
मो. नं. ९३७१०२८७३२/९९७०९६५३६५

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ १३०/-

# अखेरचा सवाल

अखेरचा सवाल
अखेरचा सवाल

या नाटकाचे सर्व हक्क सौ. उषा वसंत कानेटकर यांच्या स्वाधीन आहेत. आगाऊ लेखी परवानगी घेतल्याशिवाय या नाटकाचा कोणीही प्रयोग करू नये. परवानगी आणि परवानगीमूल्य यासंबंधात सौ. उषा वसंत कानेटकर, शिवाई, शरणपूर रोड, नाशिक–२ या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

कै. नंदू
आणि तिच्या ममी
यांना

# निवेदन

माझी भाची आणि माझे मेहुणे कै. मुकुंदराव श्रीखंडे यांची कन्या सुनंदा ऊर्फ नंदू दि. २१ जून १९७२ रोजी वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी कालवश झाली. त्यापूर्वी दोन वर्षे आधी किडनीच्या ट्यूमरसाठी तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. त्याच वेळी तिचे दुखणे कॅन्सरचे आहे याची जाण प्रथम डॉक्टरना आणि पाठोपाठ डॉक्टर असलेल्या तिच्या आईला आली. शस्त्रक्रिया करण्यात आली. त्याच वेळी तिचे दुखणे कॅन्सरचे आहे याची जाण प्रथम डॉक्टरना आणि पाठोपाठ डॉक्टर असलेल्या तिच्या आईला आली. शस्त्रक्रियेनंतर नंदू वरकरणी जरी खडखडीत बरी झाल्यासारखी दिसली तरी आज ना उद्या सेकंडरीज येणार याची डॉक्टरना आणि नंदूच्या ममींना पूर्ण कल्पना होती. १९७२ च्या जानेवारी फेब्रुवारीत नंदूचे डोके दुखायला लागले. तिच्या दृष्टीवरही परिणाम झाला. त्याच वेळी सेकंडरीज  मेंदूमध्ये डेव्हलप होत आहेत हे डॉक्टरांना आणि ममींनाही लक्षात आले. हळूहळू तिची संपूर्ण दृष्टी गेली. केसही गळाले. २१ जूनला नंदू गेली. या मधल्या काळात तिच्या घरात जे महाभारत घडले ते या नाटकात अंशत: चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे.

'अंशत:' म्हणण्याचे कारण तीन तासांच्या नाटकाच्या कथेत नंदू, ममी यांची संपूर्ण कहाणी मांडणे मला शक्यच नव्हते. मी फक्त त्यातील निवडक प्रसंग तेवढे उचलू शकलो. अंशत: म्हणण्याचे कारण दुसरेही असे की नाट्यकथा बांधताना कल्पित घटनांचे साहाय्यही मला घ्यावे लागले. सबंध नंदू-जयसिंह प्रकरण, तसेच देवदत्तांची व्यक्तिरेखा, आणि राजीव-हेमा प्रकरण मी अन्य ठिकाणाहून उचलून या नाट्यकथेवर कलम केले आहे. पण तेवढे सोडले तर नंदूची संपूर्ण व्यक्तिरेखा, तिने आणि तिच्या आईने हा वज्राघात ज्या धैर्याने आणि शौर्याने सोसला, इतकेच नव्हे तर नंदू ज्या हसतमुखाने मरणाला सामोरी गेली, त्या साऱ्या

घटना अक्षरशः खऱ्या आहेत. माझ्या आजवरच्या सर्व नाटकांत हे एकच नाटक असे आहे की, ज्यातल्या घटना, प्रसंगच नव्हेत तर संवाददेखील वास्तव आहेत, थोडेही कल्पनेला मला कधी डिवचावे लागले नाही. उलट मनात असा विचार येतो की, यातल्या किती तरी जागा अशा आहेत की निव्वळ कल्पनेने मला त्या कधीच गोचर होऊ शकल्या नसत्या. या नाटकातले अवघे नाट्य मी प्रत्यक्ष डोळ्यांदेखत पाहिले, अनुभवले तेव्हा मी स्तंभित-अगदी अवाक् झालो होतो. Facts are stranger than fiction या वचनातले मर्म मी उमजलो होतो. कल्पनाविलासाचा थिटेपणाच नव्हे तर तिरळेपणाही माझ्या लक्षात आला होता. रसरशीत सशक्त अंगयष्टीची, देखण्या मुद्रेची आणि गोड हसऱ्या स्वभावाची नंदू अगदी सहज हसत हसत मरणाला सामोरी गेली! तिला दिसेनासे झाले त्या वेळची एक गोष्ट: 'हिमालयाची सावली'च्या पहिल्या प्रयोगाला सबंध कुटुंबियांना निमंत्रण करण्यासाठी मी शीवला त्यांच्या घरी गेलो होतो. नंदूच्या डोळ्यांवर काळा चष्मा होता. नंदू हसून मला म्हणाली-''काका, आता तुमच्या एखाद्या विनोदी नाटकात मला भूमिका द्या.'' मी बघायलाच लागलो. तशी नंदू चष्मा काढून दाखवत म्हणते- ''पाहा मी कशी छान तिरळी झालेय ती.'' असे म्हणत नंदू खळखळून हसली. मी कष्टाने हसलो. या नाटकातले नंदूचे आणि तिच्या मम्मींच्या वृत्तीचे सारे लहानमोठे बारकावे मी मुळातून जसेच्या तसे उचलले आहेत. या नाटकाच्या अखेरीस आलेल्या घटनेला 'मर्सी किलिंग'चा थोडा वास येतो. पण या नाटकाचे उदिष्ट आणि अर्थ निराळाच आहे हे चतुर रसिकांच्या सहज लक्षात येईल. तो अर्थ या नाटकात ठायी ठायी इतका भरभरून व्यक्त झाला आहे की त्याचा या निवेदनात निर्देशदेखील रसिकतेचा अपमान करण्यासारखे होईल.

कै. नंदू आणि तिच्या ममी यांना प्रारंभापासून आधार देणारे माझे आप्त डॉ.अरविंद बावडेकर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी आणि माझी मावसबहीण सौ. सरोज या उभयतांनी या नाट्यलेखनात मला अपरिमित साहाय्य केले आहे. वैद्यकीय उल्लेखांच्या दृष्टीने नाटक निर्दोष व्हावे यासाठीच नव्हे तर नाटकातला ध्वन्यर्थ सुस्पष्ट व्हावा यासाठीही या उभयता पतिपत्नींनी वेळावेळी मला बहुमोल सूचना दिल्या आहेत. मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. या नाटकाचे दिग्दर्शक दामू केंकरे आणि या नाटकात प्रमुख भूमिका करणाऱ्या सौ. विजया मेहता यांनीही या

नाटकाच्या लिखितात आणि रंगमंचावरील प्रयोगात कल्पकतेने फार मोठी भर घातली आहे. गोवा हिंदू असोसिएशनचा कलाविभाग तर आता मला घरच्या माणसासारखा झाला आहे. त्याचे आभार कसे आणि कोणत्या शब्दांत मानावेत? या सर्वांशी मी कृतज्ञ आहे.

नित्याच्या रिवाजाप्रमाणे नंदू 'हिमालयाची सावली'च्या पहिल्या प्रयोगाला येऊ शकली नाही. त्याच दिवशी तिला सेकंडरीज यायला सुरुवात झाली. 'बेइमान'च्या आधी कितीतरी दिवस ती गेली होती. आता हे नाटक रंगमंचावर सादर होईल त्या दिवशी नंदू प्रेक्षागृहातून थेट रंगमंचावर अवतरलेली दिसेल. नंदूने जे हसतमुखाने सोसले ते रंगभूमीवर पाहाण्याचे बळ तरी आम्हा आप्तेष्टांना मिळेल का?

नंदू-हे नाटक म्हणजे तुझ्या अवघ्या गोड स्मृतीला वाहिलेली भाव-फुले आहेत.

१४ एप्रिल १९७४
शिवाई
शरणपूर रोड, — **वसंत कानेटकर**
नाशिक २

## तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

या लोकप्रिय (अर्थात 'रसिकांच्या हिशेबी') नाटकाची ही नवी तिसरी आवृत्ती माझे मित्र श्री. श्यामराव कोपर्डेकर आपल्या 'इंद्रायणी साहित्य' प्रकाशनतर्फे प्रसिद्ध करीत आहेत. या देखण्या आवृत्तीचे माझे रसिक वाचक, प्रेक्षक तसेच हौशी कलाकार उत्साहाने स्वागत करतील. अशी मला खात्री वाटते.

१० मार्च १९८९
शिवाई — **वसंत कानेटकर**
शरणपूर रोड, नाशिक २

## पहिला प्रयोग

या नाटकाचा पहिला प्रयोग दि गोवा हिंदू असोसिएशनचा कलाविभाग मुंबई येथे ऑगस्ट १९७४ च्या पहिल्या आठवड्यात सादर करीत आहे. या प्रयोगात भाग घेणारे कलावंत–

**दिग्दर्शन / नेपथ्य**

दामू केंकरे

**प्रकाशयोजना**

प्रकाश मळकर्णेकर

**कलाकार**

डॉ. दुभाषी : मोहन मुंगी
बॅ. देवदत्त : मधुकर तोरडमल
मुक्ताबाई : सौ. विजय मेहता
नंदू : भक्ती बर्वे
जयसिंह : उपेन्द्र दाते
हरिभाऊ : मोहनदास सुखठणकर
राजीव : अरुण जोगळेकर
हेमा : सौ. दया डोंगरे
गंगाराम : अजय वढावकर